# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पाटण (जि.सातारा) येथील कलाकारांचे प्रलंबीत मानधन मंजूर करुन देणेबाबत**

**(१) ५४३०१ (२०-०८-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील पाटण व इतर तालुक्याच्या ठिकाणी पारायण सोहळ्यामध्ये भजन, किर्तन व प्रवचन याद्वारे समाज प्रबोधनाचे सामाजिक व धार्मिक कार्य करणा-या पाटण येथील कलाकारांची घरची परिस्थिती अंत्यत गरीबीची असल्याने कुटूबांचे उदरनिर्वाहाकरीता शासनाने कलाकार मानधन सुरु करणे संदर्भात आवश्यक त्या कागदपत्रासह जिल्हा परिषद, सातारा यांचेकडील संबंधीत विभागाकडे अर्ज दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, या कलाकारांनी कलाकार मानधनासाठी अर्ज करुन तसेच हे मानधन सुरु होण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या मुलाखती देवून ४ ते ५ वर्षे उलटली तरी सातारा जिल्हा परिषदेच्या संबंधीत विभागाकडून त्यांच्या अर्जावर कोणताही निर्णय घेतला नसल्याने पाटण मधील अनेक कलाकार हे राज्य शासनाच्या कलाकार मानधनापासून वंचित राहिले आहेत, हे ही खेर आहे काय,

(३) असल्यास, सातारा जिल्हा परिषदेकडील सामाजिक न्याय विभागाकडील अशा कलाकारांची यादी घेऊन त्यानां तात्काळ मानधन सुरु करणेसंदर्भात निर्णय घेणे विषयी राज्य शासनाचे सामाजिक न्याय मंत्री व राज्यमंत्री यांचेकडे दिनांक १५ जून, २०१५ रोजी लेखी पत्राद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने यासंदर्भात संबंधीत विभाग व सातारा जिल्हा परिषदेकडून माहिती मागविली आहे काय, त्याचे थोडक्यात स्वरुप काय,

(५) असल्यास, या संदर्भात राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०१-२०१८) :** (१) होय, खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक १५ जून, २०१५ रोजीचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांना दिलेले निवेदन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास प्राप्त झालेले आहे.
(४), (५) व (६) मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांना दिलेले निवेदनासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने आयुक्त समाज कल्याण, पुणे व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सातारा यांना दिनांक १६ जुलै, २०१५ च्या पत्रान्वये आवश्यक ती कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यात पाणी नियोजनाबाबत**
**घेण्यात आलेल्या आढावा बैठकीबाबत**

**(२) ५६९८० (२०-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समवेत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पाण्याचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२१-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नालासेपारा (जि.पालघर) येथील बेकायदा चाळी व औद्योगिक वसाहतीमधील**
**रसायनमिश्रित सांडपाणी व कचऱ्याने शेती निकामी झाल्याबाबत**

**(३) ६२१९३ (२९-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा (जि.पालघर) येथील बेकायदा चाळी व औद्योगिक वसाहतीमधील रसायनमिश्रित सांडपाणी आणि कचऱ्याने आजुबाजूची शेती पूर्ण निकामी झाली असल्याचे दिनांक १० जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०२-२०१८) :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिका तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार रसायनमिश्रित सांडपाणी आणि कच-याने आजूबाजूची शेती पूर्ण निकामी झाली असल्याचे दिनांक १० जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील मोरबे धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४) ६६०७३ (२७-०१-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील चौक जवळील गावामधील शेतकऱ्यांच्या जमिनी मोरबे धरण बांधण्यासाठी सन १९८९ साली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अल्प भावाने संपादित केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणग्रस्तांना नोकऱ्या व १२ टक्के भूखंड अशा अनेक मागण्या अद्यापपर्यंत प्रलंबित आहेत तसेच मोरबे धरण हे नवी मुंबई महानगर पालिकेला विकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच धरणाच्या बाधित क्षेत्रापासून मोकळया असलेल्या जमिनीवर धरणग्रस्त शेतकरी घेत असलेले भात पीक व भाजीपाले यांची दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास नासधुस करुन नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मोरबे धरणाचे बांधकाम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केले आहे. महसूल खात्याकडून भूसंपादनाची कार्यवाही करुन त्या-त्यावेळच्या बाजारभावानुसार अंतिम निवाडे घोषित करुन भूसंपादन मोबदल्याची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(२) हे अंशतः खरे आहे

मोरबे धरणाचे बांधकाम सुरु असतेवेळी प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ५ टक्के कोट्यातून नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत. शासनाच्या प्रचलित नियमानुसार विस्थापित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करुन पुनर्वसित गावांना १३ नागरी सुविधा देण्यात आलेल्या आहेत.

सदर योजनेच्या बांधकामास पुरविण्यात येणारा निधी सिडकोने सन १९९८ पासून बंद केल्याने दिनांक २५.११.२००२ च्या शासन निर्णयातील अटीनुसार मोरबे धरण नवी मुंबई महानगरपालिकेकडे मालकी तत्वावर हस्तांतरित करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

मोरबे धरणाच्या मालकीच्या जमिनीवर एक-दोन शेतकऱ्यांनी पावसाळ्यात अल्पश: मोकळ्या जमिनीवर भाजीपाला लागवड केली होती. परंतु पावसाळ्यात धरणाच्या खालील बाजूस पाणीपातळी व पूरपरिस्थिती हाताळण्यासाठी व Vigilance साठी कुंपण व काठ्या काढण्यात आल्या होत्या. तथापि, भातपीक व भाजीपाल्याचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्रतिवर्षी निर्माण होणाऱ्या ५० हजार टन ई-कचऱ्याबाबत**

**(५) ७२१६६ (१३-०२-२०१७). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रतिवर्षी निर्माण होणाऱ्या ५० हजार टन "ई "कचरा विल्हेवाट लावण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण केली गेली नसुन केवळ २० हजार टन कचऱ्यावर मुंबई-पुणे सारख्या मोठया शहरात पूर्ण प्रक्रिया होते व उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रात हा कचरा पारंपारिक भंगार व्यावसायिक खरेदी करतात असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-वेस्ट मॅनेजमेंट ॲण्ड हॅन्डलिंग ॲक्टची प्रभावीपणे अंमलबजावणी राज्यात होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०२-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राज्यात निर्माण होणा-या ई-कच-याच्या विल्हेवाटीकरिता ई-कचरा डिस्मेंटलर करणा-या ३१ व ई-कचरा रिसायकल करणा-या ७ उद्योगांना परवानगी देण्यात आली असून त्यांची एकूण क्षमता ५५,४१० मे.टन प्रतिवर्ष इतकी आहे.

---

**नाशिक येथील गोदावरी नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत**

**(६) ७४२४८ (०६-०५-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील गोदावरी नदीचे प्रदूषण रोखण्याचे दृष्टीने विविध उपाययोजना करण्याबाबत मा.पर्यावरण मंत्री यांनी दिनांक २ डिसेंबर २०१६ रोजी वा त्या सुमारास केलेल्या नाशिक दौऱ्यामध्ये सुचविलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी शुध्दीकरणासाठी नविन धरण बांधण्याची संकल्पना देखील मांडण्यात आली, हे ही खरे आहे काय.
(३) तसेच उक्त नदीत कपडे व वाहने धुतली जावू नयेत असे आदेश कोर्टाने देवूनही नदीत कपडे व वाहने धुतली जात असल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार गोदावरी शुध्दीकरणासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१२-१२-२०१७) :** (१) होय.
(२) नाही.
(३) होय.
(४) होय.

नाशिक महानगरपालिकेने उप आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली गोदावरी नदीच्या स्वच्छतेसाठी दिनांक ०१ एप्रिल, २०१७ रोजी गोदावरी संवर्धन कक्ष स्थापन केला आहे. तसेच नागरिकांद्वारे नदीत कपडे व वाहने धुतली जाऊ नये यासाठी दिनांक १ एप्रिल,२०१७ पासून गोदावरी संवर्धन कक्षा मार्फत नागरिकांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येत आहे. दिनांक ०१ जुलै, २०१७ पर्यंत रक्कम रुपये २७०००/- दंड वसुल करण्यात आला आहे.

गोदावरी नदी प्रदूषण टाळण्यासाठी नाशिक महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे महत्वाच्या उपाय योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत.

१. रामकुंड तथा रामघाटाचे दैनंदिन स्वच्छता राखण्यासाठी उपाय योजना करण्यात येत आहे.

२. धार्मिक महत्वाचे रामघाट परिसर व नदीवरील पुलांवर निर्माल्य संकलनासाठी निर्माल्यकुंड ठेवण्यात आले आहेत.

३. रामकुंड पुलाजवळ पिंडदान तथा पुजासाहित्य इत्यादी वस्तु संकलीत करणेसाठी कृत्रीम पात्र ठेवण्यात आले आहे.

४. प्रायोगिक तत्वावर पुलाच्या बाजूने गोदावरी पात्रात निर्माल्य टाकण्यास अटकाव निर्माण करण्यासाठी जाळया बसविण्यात येत आहेत.

५. गोदावरील नदीमधील वाढणाऱ्या पाणवेली काढण्यासाठी महानगरपालिकेने विविध कामे हाती घेतली असून महानगरपालिकेच्या महासभेकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून याबाबत निविदा काढून एजंसीमार्फत कामे करण्यात येणार आहे.

६. सद्दयस्थितीत महानगरपालिकेने स्वत:ची वाहने व मनुष्यबळ वापरुन गोदावरी नदी स्वच्छ करण्याचे काम हाती घेतले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) परिसरातील सांडपाण्यामुळे उल्हास नदी प्रदूषित झाल्याबाबत

**(७) ७७४८७ (०६-०५-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहरांतुन २०० एम.एल.डी. सांडपाण्यापैकी केवळ ४० एम.एल.डी. सांडपाण्यावर प्रक्रिया करून उर्वरीत सांडपाणी उल्हास नदीच्या पात्रात सोडले जात असल्याने नदीचे पात्र प्रदुषित होत असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कडोंमपा क्षेत्रात सदर सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे चार प्रकल्प दुरावस्थेत असल्याने याबाबत भरीव निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कर्जत (जि.रायगड) येथील वाहणारी उल्हास नदी मोठया प्रमाणात प्रदुषित झाली असून सदर परिसरात दुर्गंधी पसरली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर नदी प्रदुषण मुक्त करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१२-१२-२०१७) :** (१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) शहरांतून एकूण २१६ दशलक्ष लीटर प्रतिदिन सांडपाणी निर्माण होते. सद्यस्थितीत त्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिका व रहिवाशी इमारतीले यांनी एकूण १३५.५ दशलक्ष लि. क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभारली आहेत. परंतु, सदयस्थितीत सांडपाणी एकत्रितरित्या पाईपलाईन पूर्ण न झाल्याने फक्त ४४ दशलक्ष लि. सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. उर्वरित सांडपाणी हे विविध नाल्यांद्वारे उल्हास खाडीत मिसळले जाते.

(२) होय, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने या कामासाठी शासनाकडे अमृत योजनेअंतर्गत निधीची मागणी केलेली आहे.

(३) व (४) कर्जत परिसरातून वाहणाऱ्या उल्हास नदीच्या पाण्याची गुणवत्ता महाराष्ट्र प्रदूषण मंडळामार्फत तपासण्यात येते, अहवालावरुन नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता सर्वसाधारण मर्यादेत असल्याचे दिसून येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील मानखुर्दमध्ये जैविक कचऱ्यामुळे प्रदूषणामध्ये झालेली वाढ

**(८) ७९४१७ (०६-०५-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द (मुंबई) मध्ये जैविक कचऱ्यामुळे प्रदूषण वाढले असून परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रदूषण रोखण्याकरिता कोणत्या विशेष उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील पैनगंगा, वैनगंगा, वर्धा, अंधारी, उमा, शिरना, इरई, झरपट आदि नदया मोठया प्रमाणात प्रदुषित झाल्याबाबत

**(९) ८१३२४ (०६-०५-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील पैनगंगा, वैनगंगा, वर्धा, अंधारी, उमा, शिरना, इरई, झरपट आदि नदया मोठया प्रमाणात प्रदुषित झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदयांची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर नद्या प्रदुषण मुक्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१२-१२-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयातील नदीकाठी वसलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (महानगरपालिका व नगरपालिका) हद्दीतून निर्माण होणारे घरगुती सांडपाणी प्रक्रियाकृत अथवा विनाप्रक्रिया नदीमध्ये मिसळत असल्याने नदीच्या पाण्याची गुणवत्ता खालावत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्हयातील नाग नदीचे पाणी कन्हान नदीला मिळत असून पुढे कन्हान नदी, वैनगंगा नदीला मिळते. नाग नदीचे पाणी अप्रत्यक्षरीत्या भंडारा जिल्हयातील वैनगंगाग नदीत मिसळते. परिणामी नदीच्या पाण्याची गुणवत्ता खालावत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नदीच्या पाण्याची गुणवत्ता वेळोवेळी तपासली जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नदी प्रदुषणास जबाबदार असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तहसीलच्या मुख्य पुरवठा विभागामध्ये सुरु असलेल्या गैरकारभाराची चौकशी करुन कारवाई करणेबाबत**

**(१०) ८५३२२ (२१-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तहसीलच्या मुख्य पुरवठा विभागामध्ये सुरु असलेल्या अनागोंदी गैरकारभाराची सखोल चौकशी करुन कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, उपायुक्त (कोकण विभाग-पुरवठा) यांचेकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०१-२०१८) :** (१), (२) व (३) पालघर जिल्हयातील वसई तहसिलच्या पुरवठा विभागामधील कामकाजाबाबतची स्थानिक लोकप्रतिनिधीची दि.२६.१२.२०१६ रोजीची तक्रार प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने वसई तहसिलदार यांच्याकडे तक्रारदार यांना त्यांच्याकडील उपलब्ध असलेले पुरावे घेवून सुनावणीसाठी दि.२०.७.२०१७ व ९.८.२०१७ रोजी बोलविण्यात आले होते. सदर सुनावणीस तक्रारदार गैरहजर राहीले व कोणतेही अधिकचे पुरावे सादर केले नाही. त्यामुळे तक्रार निकाली काढण्यात आली आहे.

---

**मलकापूर (ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर) येथील शाळी नदीतील प्रदूषणाबाबत**

**(११) ८५५५० (२१-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील शाळी नदीत जलपर्णीची वाढ झाली असून घाणीचे साम्राज्य पसरले आहे तर नदीवरील पुलाचे संरक्षक कठडे तुटले आहेत तसेच नदीकाठी टाकण्यात येणारा कचरा कुजल्याने दुर्गंधी पसरली असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व शाळी नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१२-१२-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदरबाबत विभागाकडे वा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यामार्फत दिनांक १५ सप्टेंबर,२०१७ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन पाहाणी केली असता, पाहाणी दरम्यान शाळी नदीमध्ये जलपर्णी व नदी काठावर कचरा टाकलेला व त्यामुळे दुर्गंधी पसरल्याचे आढळून आलेले नाही.

तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी दिनांक १३/९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये नदीकाठी कचरा कुजल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला नसल्याचे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांचा सर्रास वापर सुरु असल्याबाबत**

**(१२) ८५८८७ (२१-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांच्या उत्पादनावर कायद्याने बंदी असताना शहरात अशा पिशव्यांचा खाद्यपदार्थ विक्रेते, फळ विक्रेते, किराणा दुकान व इतरांकडून सर्रास वापर सुरु असल्याने ते पर्यावरणास घातक असून त्यामुळे प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरात व हद्दीबाहेर कमी जाडीच्या पिशव्यांचे उत्पादक कार्यरत असून सदर उत्पादकांवर कारवाईची आवश्यकता असून छुप्या पद्धतीने उक्त पिशव्या मार्केट मध्ये पाठवीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर उत्पादकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१५-०२-२०१८) :** (१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्लॅस्टिक पिशव्या उत्पादन करणाऱ्या उदयोगास पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्याचे उत्पादन करण्यासाठी मंजूरी देण्यात येत नाही. तसेच प्राण्याचे आरोग्य धोक्यात आल्याबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) पुणे परिसरात प्लॅस्टिक उत्पादन करणारे २८ उदयोग आहेत.त्या उदयोगामार्फत पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्याचे उत्पादन करण्यात येत नाही. तथापि पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशच्यांचा (कॅरी बॅग्ज) वापर, विक्रि, संग्रह, विलीगीकरण, वाहतूक व विल्हेवाट याबाबत कारवाई करण्याचे अधिकार आयुक्त किवा आयुक्तानी नामनिर्देशित केलेले अधिकारी, जिल्हाधिकारी व कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील समाजकल्याण विभागात वृध्द कलाकारांच्या मानधनाचे हजारो प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१३) ८६४४० (०९-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील समाजकल्याण विभागात मागील दोन ते अडीच वर्षापासून वृध्द कलाकारांच्या मानधनाचे हजारो प्रस्ताव निर्णयाअभावी प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कागदपत्राच्या पूर्तते अभावी हे प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कलाकार मानधन निवड समितीच्या दिनांक १० मार्च, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या तीन वर्षासाठी प्रति वर्षी ६० प्रमाणे १८० कलाकारांची निवड केली आहे. या नवीन लाभार्थ्यांच्या मानधनाची देयके ऑक्टोबर, २०१७ रोजी पारित झाली असून संबंधित लाभार्थ्यांच्या खातेवर मानधन जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत दूषित होत असल्याबाबत**

**(१४) ८६६१४ (२१-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूगर्भातून अधिक खोलातून पाण्याचा उपसा वाढत असल्याने जमिनीखालील दगडांमधील रासायनिक घटक पाण्यामध्ये मिसळत असल्याने पाण्याचे स्त्रोत दूषित होत असल्याचे मत डॉ.पवन लाभशेट्वार, शास्त्रज्ञ, नीरी यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान व्यक्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीसाठी वापरली जाणारी खते, किटकनाशके, सांडपाणी, कारखाने यामुळे पाणी प्रदूषणांचे प्रमाण वाढत असल्याने याचा नागरिकांच्या आरोग्यावर विरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलप्रदूषणांच्या कारणाचा शोध घेऊन त्यावर वेळीच उपाययोजना करण्याबाबत तसेच पाणीटंचाईचे संकट टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाच कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१०-०१-२०१८) :** (१) प्रश्नात नमूद अहवाल शासनास सादर झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) शेतीमध्ये वापरली जाणारी खते, किटकनाशके, नागरी सांडपाणी इ.मुळे जलप्रदूषण होते हे अंशत: खरे असून यावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

• नवीन उद्योगांना किमान ८०% सांडपाणी प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर वा पनर्चक्रण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

• उपरोक्त उद्योगांनी संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास जल प्रदूषण (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये कारवाई करण्यात येते.

• नविन औद्योगिक सामायिक प्रक्रिया यंत्रणेस परवानगी देताना ती शुन्य निष्कासन या तत्वावरच दिली जाते.

• नागरी सांडपाण्यामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी नगरपालिकांना नागरी सांडपाणी प्रक्रिया केंद्र बसविणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे बंधनकारक करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब (जि. उस्मानाबाद) तालुक्यातील १७ गावांमध्ये असलेली पाणीटंचाई**

**(१५) ८६८६५ (११-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील १७ गावांमध्ये पाणी टंचाई असल्याकारणाने बोअर अधिग्रहनाचे प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंचायत समिती कळंब व महसूल कार्यालयाकडून पंचनामे देखील झालेले असूनसुध्दा सदरहु प्रस्तावास अद्याप मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०२-२०१८) :** (१) कळंब तालुक्यातील १७ गावांचे विंधन विहिरी अधिग्रहणाचे प्रस्ताव ग्राम पंचायतीकडून कळंब पंचायत समितीकडे प्राप्त झाले होते.
(२) व (३) विंधन विहिरी अधिग्रहणाच्या एकूण १७ प्रस्तावापैकी ७ गावांच्या प्रस्तावात त्रुटी असल्याने पंचायत समिती, कळंब यांनी हे प्रस्ताव ग्रामपंचायतीस परत केले. तसेच ज्या १० परिपूर्ण प्रस्तावांचे पंचनामे झाले होते त्यातील ६ प्रस्तावांना मंजुरी दिली व ४ प्रस्ताव फेर सादर करण्याविषयी संबंधित ग्रामपंचायतींना कळविण्यात आले. सदर चार प्रस्ताव ग्रामपंचायतींनी उपविभागीय अधिकारी, कळंब यांच्याकडे फेर सादर केले नाहीत. त्यामुळे त्यांना मंजुरी देण्यात आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे ) येथील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या चिखलोली धरणक्षेत्रात विषारी केमिकल्सच्या गोण्यांचे ढिगारे आढळल्याबाबत**

**(१६) ८९६२३ (२१-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील पिण्याच्या पाण्याचा मुख्य जलस्त्रोत असलेल्या चिखलोली धरणाच्या काठावर रासायनिक कचऱ्याने भरलेल्या गोण्या टाकण्यात आल्याने नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याची घटना दिनांक १३ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरात गत दोन वर्षापासून सातत्याने अंबरनाथ येथील एमआयडीसी परिसरातील कंपन्यांकडून रासायनिक कचरा टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त रासायनिक कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०२-२०१८) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि.१४.६.२०१७ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि.१५.६.२०१७ रोजी केलेल्या पाहणीत चिखलोली धरणाच्या वरच्या भागात सुमारे ३-४ किमी अंतरावर रासायनिक कच-याने भरलेल्या गोण्या टाकल्याचे आढळून आले.

दि.१६.६.२०१७ रोजी सदर रासायनिक कचरा उचलून घातक घनकचरा साठवणूक व विल्हेवाट केंद्र येथे पुढील प्रक्रिया व विल्हेवाटीकरीता पाठविण्यात आला.

प्राथमिक चौकशीत दोषी आढळलेल्या ३ उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश तसेच ६ उद्योगांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या धरणाच्या पाण्याच्या पृथक्करणानुसार पाणी पिण्यास योग्य असल्याचे निदर्शनास आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड एमआयडीसी परिसरातील कारखान्यातून होणारे प्रदूषण तसेच शहरातील दूषित पाणी गोदापात्रात सोडत असल्याबाबत

**(१७) ९१०४९ (२१-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड एमआयडीसी परिसरातील अनेक कारखान्यातून निघणा-या प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारखान्यांची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नांदेड शहरातून निघालेले दूषित आणि घाण पाणी तब्बल १४ नाल्यांद्वारे गोदापात्रात सोडले जात असल्यामुळे प्रदूषण मोठया प्रमाणावर वाढल्याने या नाल्यांचे पाणी अन्यत्र वळविण्याची सूचना मा.पर्यावरण मंत्री यांनी दिड वर्षापूर्वी देऊनही अद्यापपर्यंत याबाबत महापालिकेने कोणतीच कार्यवाही केली नसून मा.पर्यावरण मंत्री यांनी संबधित अधिका-यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिनांक ९ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०२-२०१८) :** (१) व (२) जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड यांच्या अहवालानुसार, नांदेड एमआयडीसी परिसरातील कारखान्यांमधील प्रदूषणामुळे परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याची बाब मे-२०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आली नाही. तथापि मे.तिरूपती इंडस्ट्रीज या कारखान्याबद्दल प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर कारखान्यास दि.२९ मे,२०१७ रोजी ताकीद पत्र दिले आहे.

(३) व (४) या प्रकरणी माहे जून-२०१७ मध्ये महापौर व महानगरपालिका आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका यांच्यावर पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ व प्लास्टीक कचरा व्यवस्थापन अधिनियम,२०१६ अंतर्गत फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग व मुरुड (जि.रायगड) तालुक्यात सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन बांधण्यात आलेल्या इमारतींबाबत**

**(१८) ९१२१३ (२१-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग व मुरुड (जि.रायगड) तालुक्यात सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन शेतघर बांधण्याच्या नावाखाली विना परवानगी बेकायदेशीर प्रशस्त इमारती बांधल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन बांधण्यात आलेल्या इमारतीवर महसूल विभागाने इमारती तशाच ठेवून वॉलकंपाऊंड तोडून कारवाई केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार बेकायदेशिररित्या बांधण्यात आलेल्या सदर इमारतींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अहवालानुसार, अलिबाग व मुरूड तालुक्यात सीआरझेड नियमावलीचे उल्लंघन करून केलेल्या एकूण अनधिकृत बांधकामाची संख्या ३१२ इतकी असून या सर्व बांधकामधारकांना महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ तसेच, पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम ३ (१) व १५ मधील तरतुदींनुसार नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे, उपरोक्त ३१२ बांधकामांपैकी १६४ बांधकामांवर महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ तसेच, पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम ३ (१) व १५ मधील तरतुदींनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडोशी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील गावठाणाबाहेर बांधलेल्या दोन बंगल्यासंदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे करण्यात आलेल्या तक्रारीबाबत**

**(१९) ९१५७८ (२१-०८-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडोशी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील गावठाणाबाहेर बांधलेल्या दोन बंगल्यासंदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २४ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास पाहणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाहणीत कोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत व त्यानुसार संबधीत बंगला मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) उक्त प्रकरणी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तहसीलदार (खेड), उप अभियंता पाटबंधारे विभाग, खेड व पोलिस निरिक्षक, खेड यांचे समवेत केलेल्या संयुक्त पाहणीत सदर ठिकाणी गारूमिश्रित वाळूचा साठा करणे तसेच वाळू व सिमेंटपासून फरशी तयार करण्याची यंत्रणा विनापरवानगी बसविली असल्याचे दिसून आले.

वाळू व सिमेंटपासून फरशी तयार करण्यास परवानगी घेतली नसल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगास दि.१४.६.२०१७ रोजी बंद आदेश पारित केले आहेत.

तसेच, गारूमिश्रित वाळूच्या साठ्याबाबत तहसीलदार (खेड) यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना अहवाल सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू नगरपरिषदेच्या क्षेत्रात सरावली-मानफोड पाडा येथील खाडीत फुगा कंपनीतून होणारे प्रदूषण**

**(२०) ९३०७१ (२१-०८-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू नगरपरिषदेच्या क्षेत्रात सरावली-मानफोड पाडा येथील खाडीत फुगा कंपनीतून प्रदूषित पाणी, कचरा सोडला जात असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०२-२०१८) :** (१) सरावली- मानफोड पाडा येथील खाडीत फुगी कंपनीतून प्रदूषित पाणी, कचरा सोडला जात असल्याची कोणतीही तक्रार मे,२०१७ वा त्या दरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील रामराज नदीपात्रात उभारण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनेचे काम ग्रामस्थांनी बंद पाडल्याबाबत**

**(२१) ९३२४५ (२१-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील रामराज नदीपात्रात राष्ट्रीय पेयजल योजनेतून उभारण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनेचे काम ग्रामस्थांनी बंद पाडल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेकरिता पाणी पुरवठ्याकरिता असलेली पाण्याची टाकी ही रामराज नदीपात्रात बांधण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पाण्याच्या टाकीच्या बांधकामाला ग्रामस्थांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे ग्रामस्थांनी तक्रार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व ग्रामस्थांच्या तक्रारीनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रामराज गावासाठी रामराज ग्रामपंचायतीने ग्रामसभेत मंजूर केलेल्या ठरावानुसार ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने उपलब्ध करुन दिलेल्या गावठाणाच्या ठिकाणी नदी पात्राच्या कडेला नदीपात्राच्या किनाऱ्यापासून सुमारे १५ मीटर अंतरावर पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. पाण्याच्या साठवण टाकीस भविष्यात पुराच्या पाण्याचा धोका पोहचू नये यासाठी टाकीभोवती संरक्षण भिंत बांधण्याचे प्रस्तावित आहे.
(३ व ४) हे खरे नाही.
ग्रामपंचायतीच्या दिनांक ०६.०२.२०१६ रोजीच्या ग्रामसभेमध्ये ठराव क्रमांक ४८(१) अन्वये पाण्याची टाकी बांधण्याच्या कामास विरोध नसल्याचा ठराव ग्रामसभेने पारित केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील स्वस्त धान्य दुकानदारांनी ई-पॉस मशिनध्ये फेरफार करुन गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२२) ९५०३७ (२९-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील २६०९ दुकानात ई-पॉस मशिन बसविण्याची सोय केली असून बायो मेट्रीक पध्दतीने लाभार्थ्यांना धान्याचे वाटप सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त जिल्हयातील सुरगाणा गैरव्यवहाराची चौकशी सुरु असतानाच जिल्हयासह खादगांव (ता.नांदगांव) येथील रास्त भाव दुकान नंबर १५४ आणि मौजे बोराळे येथील दुकान नं.३७ या दुकानांत ई पॉस मशिनमध्ये फेरफार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या निदर्शनास आले असून पेटीएम पॉस मशिनमध्ये फेरफार व कामात अनियमिततेबाबत नाशिक विभागाच्या पुरवठा अधिकाऱ्यांकडे माहे जुलै-ऑगस्ट, सप्टेंबर दरम्यान सुमारे २० ते २२ तकारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच ई पॉस मशिनचा वापर पारदर्शकतेने होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-०२-२०१८) :** (१) नाशिक जिल्हयांसाठी २५९६ ई-पॉस मशीन उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत व लाभार्थ्यांना बायोमेट्रिक पध्दतीने धान्याचे वाटप सुरु केले आहे.

(२) सदर दोन्ही रास्तभाव दुकानदार यांनी माहे सप्टेंबर २०१७ महिन्यात शिधावस्तू वाटप करण्यापूर्वीच सेल क्लोज (Sale Close) चे बटन दाबल्याने सेल बंद झाला होता. सदर प्रकरणी तहसीलदार नांदगाव यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

ई-पॉस मशीनसंबंधी मालेगांव शहर स्वस्तधान्य दुकानदार संघटना व नाशिक जिल्हा स्वस्तधान्य दुकानदार संघटना यांचे तक्रार वजा निवेदन प्राप्त झालेले होते.

(३) सदर दोन्ही रास्तभाव दुकानदार यांनी अनियमितता केल्याचे आढळून आल्याने त्या रास्तभाव दुकानांचे प्राधिकारपत्र जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी रद्द केले होते. तद्नंतर सदर दोन्ही रास्तभाव दुकानदारांनी उपायुक्त पुरवठा, नाशिक यांचेकडे अपील केले होते. या अपील सुनावणीमध्ये दोन्ही दुकानदारांचे १०० टक्के अनामत रक्कम जप्त करण्याचे आदेश कायम ठेवण्यात आलेले असून दुकानांचे प्राधिकारपत्र रद्द करण्याचे आदेश मात्र रद्दबातल करून नवीन आदेशान्वये दोन्ही दुकाने पुनर्स्थापित करण्यात आलेली आहेत.

रास्तभाव दुकानातून ई-पॉस मशीनद्वारे होणारी शिधावस्तूंची विक्री तपशील यामध्ये पारदर्शकता येण्यासाठी www.mahafood.gov.in या विभागाच्या संकेतस्थळावर जनतेसाठी उपलब्ध करुन दिला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आधार कार्ड रेशन कार्डाशी लिंक करण्याच्या निर्णयाबाबत**

**(२३) ९५०३९ (२९-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आधारकार्ड रेशनकार्डशी लिंक करण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच रास्त धान्य योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्याजवळ आधार कार्ड नाही अथवा त्याचे रेशन कार्ड आधार कार्डशी जोडलेले नाही त्याला या योजनेचे फायदे नाकारु नयेत अशा सूचना केंद्राने प्रत्येक राज्याला जारी केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात किती रेशनकार्ड आधार कार्डशी लिंक करण्यात आले आहेत व लाभार्थ्याचे नांव रेशनकार्ड डेटाबेसमधून वगळणे तसेच स्वस्त धान्य देण्याबाबत असलेले निकष याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील गोरगरीब नागरिकांना रेशनवरील धान्य घेता यावे म्हणून रेशन कार्ड आधार कार्डशी लिंक करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०२-२०१८) :** (१) राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात येत असून याबाबत शासनाने दि.१८ मे, २०१६ रोजी लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून शिधावस्तूचे वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत सर्व लाभार्थ्यांचे मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक व बँक खाते क्रमांक इ. माहिती पीडीएस डाटाबेसमध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) केंद्र शासनाने दि.२४ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व राज्यांना कोणत्याही लाभार्थ्यास आधार क्रमांक नाही, या कारणास्तव शिधावस्तू लाभ नाकारू नयेत अशा सूचना दिलेल्या आहेत.

(३) अद्यापपावेतो राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत एकूण ७ कोटी पात्र लाभार्थ्यांपैकी ८७% (६.१० कोटी) तसेच १४ दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील शेतकरी लाभार्थ्यांच्या आधार सिडींगची ८६% कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे. Data Digitization केल्याने सुमारे १० लक्ष शिधापत्रिका या दुबार, मयत व प्रत्यक्ष गृहभेटीद्वारे अपात्र ठरल्याने वगळण्यात आलेल्या आहेत.

(४) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांन्वये आधार क्रमांक शिधापत्रिकेशी लिंक करण्यासाठी माहे मार्च २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून उर्वरित लाभार्थ्यांच्या आधार सिडींगची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच, शासनाने दि.१७ एप्रिल २०१७ रोजीच्या पत्रान्वये कोणताही पात्र लाभार्थी शिधावस्तू लाभापासून वंचित राहू नये याबाबत काळजी घेण्याच्या सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**

**(२४) ९५२९३ (२९-१२-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयात अल्प पाऊस झाल्यामुळे जिल्हयातील ११ गावांना टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुळे तालुक्यातील हेंद्रूण व फागणे या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव प्रशासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त गावात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबत तसेच जिल्हयातील टंचाईसदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) धुळे तालुक्यातील हेंद्रूण व फागणे या गावांपैकी फक्त फागणे या गावांला टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाला आहे.
हेंद्रूण या गावासाठी टँकरची मागणी प्राप्त झालेली नाही.
(३) फागणे गावालगतच्या लघु तलावात शेवडीचे काम पूर्ण करण्यात आल्यामुळे अद्यापपर्यंत टँकरची गरज लागली नाही.
धुळे जिल्हयातील टंचाई सदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी माहे ऑक्टोबर, २०१७ ते जुन-२०१८ या कालावधीकरिता टंचाई भासणा-या १७५ गावे व ९७ वाडयासाठी २७६ उपाययोजनांकरिता रु. ४२८.८४ लाख किमंतीचा संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे त्यानुसार टंचाई कालावधीत आवश्यक तेथे पाणी टंचाई निवारणार्थ आवश्यक त्या उपाययोजना राबवून टंचाई परिस्थिती हाताळण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदुर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यात रॉकेलचा होत असलेला काळाबाजार**

**(२५) ९५६८८ (२९-१२-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील चांदुर बाजार शहरासह संपुर्ण तालुक्यात रॉकेलचा काळाबाजार मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहनांमध्ये डिजेलसह रॉकेलचा वापर करण्यात येत असल्याने प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, पुरवठा विभाग व शासनाकडून रॉकेलचा कोटा कमी येत असून ग्रामीण भागातील लाभार्थ्यांचे रॉकेल माफियांमार्फत विकले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार रॉकेलचा काळाबाजार थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली व संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१९-०१-२०१८) :** (१) दि.२७.८.२०१७ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यातील ९ केरोसिन परवान्याची तपासणी केली असता केरोसिन परवानाधारकाच्या स्टॉक तपासणीबाबत साठा बरोबर आढळून आला. तपासणीदरम्यान शिधापत्रिकाधारकाचे बयाण घेण्यात आले असता प्रत्येक महिन्याला नियमित केरोसिन मिळत असल्याचे शिधापत्रिकाधारकांनी बयाणामध्ये नमूद केले आहे.

(२) तहसीलदार चांदुरबाजार यांचे तपासणी पथकाने वाहनामधील इंधनाचे एकूण ४ नमुने घेऊन तपासणीकरिता पाठविण्यात आले आहेत. तपासणी अहवाल प्राप्त होताच नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यास मागणीच्या १००% इतक्या प्रमाणात केरोसिन नियतन मंजूर करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ (जि.जळगांव) येथील शासकीय धान्य गोदामात तपासणीवेळी आक्षेपार्ह कागदपत्र निदर्शनास आल्याबाबत**

**(२६) ९५७५५ (२९-१२-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) येथील शासकीय धान्य गोदामात अरविंद अंतुरलीकर, जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी व पुरवठा तपासणी अधिकारी तपासणीसाठी गेले असता तिथे सापडलेल्या अनेक आक्षेपार्ह कागदपत्रांबाबत दिनांक ३० मे, २०१७ रोजी पत्र क्र.पुरवठा/चौकशी-१/कावि/९/११५/२४३०/२०१७ नुसार एक लेखी तक्रार केल्याची बाब दिनांक ४ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी उपरोक्त तक्रारीमध्ये शासकीय गोदामात स्वच्छक म्हणून कार्यरत असलेले श्री.अकबर खान सिकंदर खान हे गतअनेक वर्षापासून शासकीय गोदामात कामाला असून अनेक सामाजिक राजकीय संघटना व व्यक्ती यांच्या लेटर हेडवर शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचे विरोधात माहिती अधिकार व तक्रार टाकून गैरव्यवहार दडपत असल्याचे व करीत असल्याचे निदर्शनास आल्याबाबत नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.अकबर खान सिकंदर खान हे गेली अनेक वर्षे एकाच जागी काम करीत असून, शासकीय गोदामाच्या रजिस्टरमध्ये अनेक आक्षेपार्ह कागद सापडले, याचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-०२-२०१८) :** (१), (२) व (३) जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगाव, सहा.जिल्हा पुरवठा अधिकारी व पुरवठा तपासणी अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जळगाव यांनी दि.२६.०५.२०१७ रोजी भुसावळ येथील शासकीय धान्य गोदामाच्या अचानक तपासणी केली. सदर तपासणीबाबत जिल्हाधिकारी जळगाव यांना सादर केलेल्या दिनांक ३०/५/२०१७ च्या अहवालात भुसावळ येथील धान्य गोदामातील रजिस्टरमध्ये माहिती अधिकारान्वये मागणी केलेली कागदपत्रे, कोरे माहितीचे अधिकार अर्ज तसेच आयुक्त, उपायुक्त, जिल्हा पुरवठा अधिकारी, सहा.जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे विरुध्द करावयाच्या तक्रारी अर्जाचे हस्ताक्षरातील कागदपत्रे सापडली असून सदर माहिती अधिकार अर्ज करण्याचे काम गोदामातील स्वच्छक श्री.अकबरखान नादरखा पठाण हे करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याचे नमूद केले आहे.

(४) व (५) दि.२२/०६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये श्री.अकबरखान नादरखा पठाण, गोदाम स्वच्छक यांची तहसिल कार्यालय, भुसावळ येथून तहसिल कार्यालय, बोदवड येथे सेवा वर्ग करण्यात आली आहे. याप्रकरणी परीपुर्ण चौकशी करून कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांनी उप विभागीय अधिकारी, भुसावळ यांना दि.०९.०१.२०१८ च्या पत्रान्वये आदेशित केले आहे.

---

**येवला (जि.नाशिक) शहरातील गंगासागर तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेतून निधी मिळणेबाबत**

**(२७) ९६४७९ (३०-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) शहरातील गंगासागर तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेतून निधी मिळणेसाठी शासनास प्रस्ताव पाठविण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास नाशिक जिल्हा प्रशासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने गंगासागर तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेतून निधी मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व उक्त प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१५-०२-२०१८) :** (१) होय. मा.छगनराव भुजबळ यांनी दिनांक ०७ जुलै, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, येवला नगरपरिषदेस गंगासागर तलावाला पर्यावरण संवर्धनासाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याबाबत कळविले होते.

(२) व (३) मुख्याधिकारी, येवला यांच्या अहवालानुसार गंगासागर तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजजनेंतर्गत प्रस्ताव मंजुरीसाठी नगरपरिषद सभेच्या ठरावाची आवश्यकता असून माहे डिसेंबर, २०१७ मध्ये होणाऱ्या नगरपरिषद सर्वसाधारण सभेवर सदर विषयांस मंजुरी घेण्यात येईल. तसेच ठराव पारित झाल्यावर सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास मंजुरीसाठी व निधी मिळण्यासाठी सादर करण्यात येईल. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शासन स्तरावरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**समद्रपुर (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील पुरवठा निरिक्षकाविरुध्द प्रस्तावित शिस्तभंगाविषयक कारवाई पूर्ण करण्याबाबत**

**(२८) ९७०८७ (२९-१२-२०१७). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समद्रपुर (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील पुरवठा निरिक्षकाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान गैरव्यवहार केल्याने संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी त्यांची बदली सेवा जिल्हा पुरवठा कार्यालय, वर्धा येथे करुन कारणे दाखवा नोटीस दिली असून सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, वर्धा यांनी उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांनी प्राथमिक चौकशीत पुरवठा निरिक्षक, समुद्रपूर यांच्याविरुध्द तक्रारीत सत्यता आढळून आली आहे, संबंधित पुरवठा निरिक्षकाविरुध्द शिस्तभंगाविषयक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे असा अहवाल जिल्हाधिकारी यांना दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित पुरवठा निरिक्षकाविरुध्द प्रस्तावित शिस्तभंगाविषयक कारवाईचे थोडक्यात स्वरुप काय व उक्त कारवाई केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-०१-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) संबंधित पुरवठा निरीक्षकाविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम-८ खाली कारवाई सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात धान्य कोटा वाढवून मिळण्याची मागणी**

**(२९) ९७२७६ (२९-१२-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात प्रशासकीय कर्मचारी व रेशनधान्य दुकानदार यांच्या चुकांमुळे सतत ३-४ महिन्यापासून सुमारे ७७ हजार लोकांचा धान्यकोटा कमी झाला असून उक्त कोटा वाढवून मिळावा अशी मागणी तहसिलदार यांच्याकडे दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार धान्य कोटा पूर्ववत देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०२-२०१८) :** (१) होय.
(२) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना लागू झाल्यानंतर नेवासा तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात २,७३,०९५ एवढ्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. तद्नंतर शासन निर्णय दिनांक ३.३.२०१७ अन्वये अहमदनगर जिल्ह्यास दिलेल्या वाढीव इष्टांकामधून नेवासा तालुक्यासाठी प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी वाढीव इष्टांक देऊन २,७५,५८२ एवढा इष्टांक करण्यात आला. नेवासा तालुक्यामध्ये सद्यस्थितीत प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये एकूण २,६५,५१५ एवढ्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ सुरळीतपणे देण्यात येत आहे.

नेवासा तालुक्यामध्ये मयत, स्थलांतरित इत्यादी कारणांमुळे तसेच, स्वेच्छेने अन्नधान्याचा लाभ न स्विकारण्याचे लेखी दिलेल्या अर्जांनुसार लाभार्थ्यांची नावे यादीतून कमी करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार सद्यस्थितीत १०,०६७ इतका इष्टांक शिल्लक असून, पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे नेसरी (ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर) या गावाची नळपाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत**

**(३०) ९७३८६ (२९-१२-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नेसरी (ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर) या गावाच्या नळपाणीपुरवठा योजनेला शासनाने प्रशासकीय मान्यता देऊन रूपये ४ कोटी ८० लाख इतका निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निधी मंजूर करुनही शासनाने कामाला सुरुवात केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजना तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्याकडे दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सदर योजना कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) होय, हे खरे आहे.

मा.श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, वि.स.स. यांनी दि.२८.०७.२०१७ रोजी मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता यांचेकडे लेखी पत्राद्वारे नेसरी गावाच्या पाण्याचा प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने मागणी केली आहे.

नेसरी येथील नळपाणी पुरवठा योजनेचा सन २०१७-२०१८ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत आराखड्यात समावेश केलेला असून या योजनेचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोल्हापूर यांनी तयार करुन जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत अधिक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष, पुणे यांचेकडे दि.०७.११.२०१७ रोजी तांत्रिक मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. तांत्रिक मंजूरी मिळालेनंतर प्रशासकिय मंजूरी घेऊन पुढील कार्यवाही करणेत येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**अहमदनगर जिल्ह्यात अन्न धान्य वाहतूक ठेकेदाराने अन्न धान्याची वाहतूक अनियमितपणे केल्याबाबत**

**(३१) ९७६७२ (२९-१२-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील अन्नधान्य वाहतूक ठेकेदार यांनी माहे एप्रिल, २०१५ ते मे, २०१५ या कालावधीमध्ये दुसऱ्या टप्प्यातील वाहतूक काही तालुक्यात पूर्ण केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालावधीत दुसऱ्या टप्प्यातील वाहतूक स्वस्त धान्य दुकानदार यांनी स्वखर्चाने केली आहे, हे खरे आह काय,

(३) असल्यास, उक्त स्वस्त धान्य दुकानदार यांनी केलेल्या वाहतुकीचे देयक वाहतूक ठेकेदाराच्या देयका मधून उक्त रक्कम कपात करून उक्त दुकानदारांना देयके अदा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) संबंधित कालावधीची देयके वाहतुकदारास अदा करण्यात आलेली नाहीत. मात्र संबंधित कालावधीत शिधा वाटप दुकानांपर्यंत वाहतूक केलेल्या शिधा वाटप दुकानदारांना त्यांनी केलेल्या वाहतुकीसाठी वाहतूक रिबेट अदा करण्याच्या सूचना जिल्हा पुरवठा अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील शालिनी पॅलेसचे जतन व संवर्धन करण्याबाबत**

**(३२) ९८४०८ (३०-१२-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील रंकाळा तलावाच्या काठावरील शालिनी पॅलेसचे जतन संवर्धन व संरक्षण व्हावे याकरिता ही वास्तू राज्य पुरातत्व विभागाकडे हस्तांतरित करावी तसेच कोल्हापूरच्या "शाहूपुत्र" छत्रपती राजाराम महाराज यांच्या स्मारकासह कोल्हापूरचे मुख्य पर्यटन माहिती केंद्र येथे सुरू करण्यात यावे या मागण्यांचे निवेदन इतिहासप्रेमीनी वारंवार पुरातत्व विभागाला दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त निवेदनानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) तदनुसार सदर निर्णयावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सदर स्मारक राज्य संरक्षित स्मारक नाही.
शालिनी पॅलेस ही वास्तु खाजगी व्यक्तीची आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रोहा (जि.रायगड) येथील रास्तभाव किरकोळ परवानाधारकाने**
**रॉकेलचा केलेला अपहार**

**(३३) ९८७७० (२९-१२-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोहा (जि.रायगड) येथील रास्तभाव किरकोळ रॉकेल परवानाधारकाने ६५७५ लिटरचा रॉकेलचा अपहार केल्याचे माहितीच्या अधिकारात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या संतप्त ग्रामस्थांनी काळाबाजार करणाऱ्या दुकानदारांविरोधात मा.अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री व जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१९-०१-२०१८) :** (१) व (२) श्री.पांडुरंग जनार्दन कडू, रा.गोफण, ता.रोहा यांनी माहितीच्या अधिकारात माहिती प्राप्त करुन घेऊन श्री.दिनेश पांडुरंग कडू या किरकोळ केरोसिन परवानाधारकाने ६५७५ लिटरचा केरोसिनचा अपहार केल्याने याबाबत योग्य ती चौकशी करुन शिधापत्रिकाधारकांना न्याय मिळवून देण्याबाबत ग्रामस्थांच्या सह्यांसह तक्रार जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांचेकडे दि.१२.९.२०१७ रोजी केली.
(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने मौजे गोफण, ता.रोहा येथील किरकोळ केरोसिन परवानाधारक श्री.दिनेश पांडुरंग कडू यांच्या दुकानाची पुरवठा निरिक्षक अधिकारी, रोहा यांनी तपासणी केली. सदर परवानाधारकाने विक्री रजिस्टरवर केरोसिनची जादा नोंद करुन, प्रत्यक्षात शिधापत्रिकाधारकांना कमी केरोसिन दिले असून ५३ शिधापत्रिकाधारकांच्या सन २०१५ ते सन २०१७ पर्यंतच्या नोंदी तपासल्या असता सदर परवानाधारकाने एकूण प्राप्त केरोसिनपैकी ३२९७ लिटर केरोसिन शिधापत्रिकाधारकांना कमी वाटप केल्याचे निदर्शनास आले आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांनी सदर परवाना रद्द केला असून कमी वाटप केलेल्या ३२९७ लिटर केरोसिनची रु.७५,८३१/- इतकी रक्कम वसूल करण्याबाबत आदेश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात स्वस्तात धान्य दुकानांमध्ये ई-पॉस यंत्राद्वारे वीजबिल, मोबाईल बिल भरण्यासाठी वयोवृध्द जेष्ठ नागरीक या लाभापासून वंचित राहणार असल्याबाबत.**

**(३४) ९८९५८ (२९-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात स्वस्त धान्य दुकानांमध्ये साखर, गहू, तांदूळ अशा धान्याचा वितरणाबरोबरच ई-पॉस यंत्राद्वारे वीजबिल, मोबाईल बिल भरण्यास इतरही कामे आता नागरीकांना करता येणार असून या निमित्ताने स्वस्त धान्य दुकानांना आता "रेशन दुकान सेवा केंद्र म्हणून नवी ओळख मिळणार असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रक्रिया शासन कोणत्या कालावधीपासून राबविणार आहे,
(३) तसेच राज्यातील आधार नसणा-या नागरीकांना धान्य मिळणार नसल्याने व ८० वा ९० वर्षे पार केलेले व आजारी असलेले जेष्ठ नागरीक उक्त लाभापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही,

तथापि, CSC e-Governance Services India Ltd., नवी दिल्ली या कंपनीस राज्यातील रास्तभाव दुकान व किरकोळ केरोसीन दुकानांद्वारे वितरीत होणाऱ्या वस्तुंची किंमत अदा करण्यासाठी Aadhar Enabled Payment System (AePS) चा वापर करण्यास "राज्यातील ज्या रास्तभाव/शिधावाटप दुकानदार व किरकोळ केरोसीन दुकानदारांकडे त्यांच्या स्वत:चा लॅपटॉप व १५० स्केवर फुट अतिरिक्त जागा उपलब्ध आहे, त्यांना अतिरिक्त सेवा (उदा. विविध बिलांचा भरणा करणे, रेल्वे विमान तिकिट इ.) सेवा पुरविण्यात याव्यात" या व इतर अटींच्या अधिन राहून शासन परिपत्रक दि.०४ मार्च,२०१७ अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) राज्यातील कोणत्याही पात्र लाभार्थ्यास आधार क्रमांक नाही अथवा चुकीचा आहे या कारणास्तव शिधावस्तू लाभ नाकारु नयेत अशा सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयांना शासनाने दि.१७ एप्रिल, २०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या असून आधार क्रमांक नोंदणीसाठी केंद्र शासनाच्या निर्देशांन्वये माहे मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच आजारी जेष्ठ नागरिकांच्या ऐवजी त्यांच्या कुटुंबातील कोणातही व्यक्ती पूर्वीप्रमाणेच शिधावस्तु घेऊन जाऊ शकतो.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील भीमा नदीच्या तीरावर वसलेले बेगमपूर, माचणूर व ब्रम्हपुरी या गावातील स्थळांचे सुशोभिकरण करण्याबाबत**

**(३५) ९९७३० (३०-१२-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील भीमा नदीच्या तीरावर वसलेले बेगमपूर, माचणूर, ब्रम्हपुरी या गावातील ऐतिहासिक स्थळे जीर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऐतिहासिक स्थळांच्या दुरूस्तीकरिता राज्य पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे स्थानिक नागरिकांनी या स्थळाचे सुशोभीकरण करण्याबाबत प्रशासनाकडे अनेकदा मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गडाच्या (पर्यटन स्थळाच्या) विकासाकरिता निधीची मागणी होऊनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे या ऐतिहासिक गडाची दुरवस्था वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त ऐतिहासिक स्थळांचे सुशोभिकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सदर ऐतिहासिक स्थळे भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला (जि.अकोला) अंतर्गत असलेले द्वारपोच योजनेचे धान्य वाशीम येथे साठविण्यात येत असल्याबाबत**

**(३६) ९९७७४ (२९-१२-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) शासकीय धान्य गोदामांतर्गत असलेल्या द्वारपोच योजनेचे धान्य अकोला जिल्हयात साठवण न करता ४० कि.मी. अंतरावर वाशीम येथे साठविण्यात येत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्हयात नाममात्र भाडयावर गोदामे व जागा उपलब्ध असतांना वाशिम येथे धान्य साठविण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर द्वारपोच योजनेचे धान्य वाशीम येथून अकोला जिल्हयात आणतांना धान्याचा अपहार झाल्याच्या अनेक घटना निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहेत काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार धान्याचा अपहार व वाहतुकीचा खर्च कमी करण्याबाबत तसेच अकोला येथे धान्य साठवण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही. अकोला जिल्हयासाठी असलेल्या महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, शिवणी येथील बेसडेपोतून धान्य उपलब्ध होत नसल्याने, भारतीय खाद्य निगमकडून सप्टेंबर, २०१७ पासून केंद्रीय वखार महामंडळ, वाशिम येथून अकोला जिल्हयासाठीचे नियतन देण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) अपहाराची बाब निदर्शनास आलेली नाही. मात्र, दि. ८ सप्टेंबर, २०१७ रोजी शासकीय धान्य गोदाम पातूर येथून NFSA योजनेचा ३४० कट्टे तांदुळ भरलेला ट्रक पातूर पासून १० किलोमीटर अंतरावर दिग्रस फाट्यावर पोलीसांना आढळून आल्याने त्याबाबत तहसिल कार्यालयाशी संपर्क करुन पातूर गोदामामध्ये सदर ट्रक पोहोचविण्यात आला.

(४) ट्रक चोरीबाबत पोलीस स्टेशन, पातूर येथे संबंधित वाहनमालकाकडून दि. ९ सप्टेंबर, २०१७ रोजी लेखी तक्रार नोंदविण्यात आलेली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने एफआयआर दाखल करण्यात आला असून, पुढील कार्यवाही सुरु आहे. सदर घटनेनंतर धान्याच्या अपहाराची व चोरीला गेल्याची घटना अद्यापपर्यंत घडलेली नाही.

जिल्हाधिकारी, अकोला यांनी जिल्हयातील द्वारपोच योजना परिणामकारकपणे राबविण्यासाठी तपशिलवार सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, शिवणी येथून धान्याची उचल मिळावी यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत, वाशिम येथून धान्य उचलल्यामुळे होणाऱ्या अतिरिक्त खर्चाची मागणी भारतीय खाद्य निगम यांच्याकडे करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील नवी मुंबई परिसरातील उलवे टेकडीवरील वाघिवली वाडा गावाजवळ बौध्दकालीन लेणीचे संरक्षण करण्याबाबत**

**(३७) ९९८६५ (३०-१२-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील नवी मुंबई परिसरातील उलवे टेकडीवरील वाघिवली वाडा गावाजवळ बौध्दकालीन लेणी असून या लेण्यांची बॉम्बे गॅझेटमध्ये अडीच हजार वर्षापूर्वीच्या रायगड भागातील लेण्यांमध्ये वाघविली वाडा लेण्या अशी नोंद असून सन २०१३ मध्ये पुरातत्व विभागाने या लेण्यांना भेट दिली होती व त्यावेळी जिल्हाधिकारी ठाणे व रायगड यांनी या लेण्यांना संरक्षण देण्याच्या सूचना दिलेल्या होत्या, हे खरे आहे काय

(२) तसेच नवी मुंबईत होणा-या आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी उलवे टेकडी येथील सपाटीकरणाचे काम सिडको मार्फत सुरु असून त्यात उक्त बौध्द लेणी नष्ट होण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली असून सिडको कडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अडीच हजार वर्षा पूर्वीपासून असलेल्या बौध्द लेण्यांचे संरक्षण व्हावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागात नागरिकांना देण्यात येणाऱ्या दुयम शिधापत्रिका वाटपाची चौकशी करण्याची मागणी**

**(३८) १०००९९ (२९-१२-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागात नागरिकांना देण्यात येणाऱ्या दुयम शिधापत्रिकांवाटपात झालेल्या निष्क्रियतेची (गोंधळाची) चौकशी करण्याची मागणी दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास तहसिलदारांकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितावर कोणती कारवाई केली तसेच नागकिांना योग्य शिधापत्रिका मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पुरवठा निरिक्षण अधिकारी, भिवंडी यांच्या दि.९.११.२०१७ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने शिधापत्रिकाधारकांना दुय्यम शिधापत्रिका देताना दुय्यम शिधापत्रिकांची फी संबंधीत पुरवठा लेखा अव्वल कारकुन सौ.अर्चना परे व तत्कालिन लिपिक श्री.संभाजी सिंधु चव्हाण यांनी सरकार जमा न करता अपहार केल्याचे दिसून आले आहे. त्यानुषंगाने त्यांच्याविरूध्द तहसीलदार, भिवंडी यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे दि.२८.१२.२०१७ अन्वये सविस्तर अहवाल सादर केला असून त्यांच्याविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ६ (२) व १० नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. तसेच श्रीमती अर्चना परे यांचा पुरवठा लेखा अव्वल कारकुन या पदाचा कार्यभार काढून त्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या शाखेत अकार्यकारी पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे.त्यानुषंगाने त्यांच्याविरूध्द तहसीलदार, भिवंडी यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे दि.२८.१२.२०१७ अन्वये सविस्तर अहवाल सादर केला असून त्यांच्याविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ६ (२) व १० नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. तसेच श्रीमती अर्चना परे यांचा पुरवठा लेखा अव्वल कारकुन या पदाचा कार्यभार काढून त्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या शाखेत अकार्यकारी पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील समाजकल्याण कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या अनुदानापासून वृध्द कलावंत वंचित राहिलेबाबत

**(३९) १००२२७ (३०-१२-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील समाजकल्याण कार्यालयामार्फत वृध्द कलावंतांना देण्यात येणाऱ्या मानधन प्राप्त कलावंतांच्या प्रसिध्द झालेल्या यादीत पक्षपातीपणा केल्याने या मानधन समितीची चौकशी करावी या मागणीसाठी कोल्हापूर जिल्हा शाहीर परिषदेच्या वतीने मार्चाचे आयोजन करुन व्यापक आंदोलन उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले.

व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी शासन निर्णय दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१४ च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या दोन आर्थिक वर्षात प्रत्येकी ६० या इष्टांकानुसार १२० कलावंताची निवड करण्यात आलेली आहे. तसेच याबाबत पक्षपातीपणा झालेला नाही, असे

अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा शाहीर परिषद, कोल्हापूर यांना दि.२१ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी कळविले आहे. त्यानंतर कुठल्याही प्रकारचे आंदोलन करण्यात आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वरुडे आणि वाडा (ता.खेड, जि.पुणे) या गावांचा मुख्यमंत्री पेयजल योजनेंतर्गत योजनांच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत**

**(४०) १००३८० (२९-१२-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वरुडे आणि वाडा (ता.खेड, जि.पुणे) या गावांचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजने मध्ये केला असून प्रस्ताव शासनास सादर केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावांचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, प्रस्तावाची सद्य स्थिती काय आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांमध्ये मौ.वरुडे व वाडा (ता.खेड, जि.पुणे) या गावांचा समावेश आहे. मौ.वरुडे गावाचा रु.१२४.४१ लक्ष किंमतीचा प्रस्ताव दि.२७.१२.२०१७ रोजी मंजूरीसाठी शासनास प्राप्त झाला आहे. परंतु मौ.वाडा योजनेचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी अद्याप अप्राप्त आहे.
(२) व (३) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.११.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२.०० कोटी पर्यंत किंमतीच्या योजनांच्या तांत्रिक तपासणीचे अधिकार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखालील समितीस प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करणेबाबत संबंधिताना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोरगिरी (ता.खेड, जि.पुणे) परिसरातील भोरगड,कोटेश्वर मंदिर या ऐतिहासिक वास्तुंचा समावेश राज्य संरक्षित स्मारकामध्ये करण्याची मागणी**

**(४१) १००४८४ (३०-१२-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोरगिरी (ता.खेड, जि.पुणे) परिसरातील भोरगड, कोटेश्वर मंदिर या ऐतिहासिक वास्तुंचा समावेश राज्य संरक्षित स्मारकामध्ये करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक

२८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त ऐतिहासिक वास्तू राज्य संरक्षित स्मारक म्हणून समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) भोरगड येथील गुहा व इतर अवशेष तसेच कोटेश्वर मंदिर या वास्तुंची पाहणी सहाय्यक संचालक, पुणे या कार्यालयाद्वारे करण्यात आली असून येथील बांधकामाची शैली सर्वसाधारण असल्याने सदर वास्तु पूरातत्वीय संकेतानुसार राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्या योग्य नसल्याचे आढळून आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासकीय धान्याचा पुरवठा करणाऱ्या वाहनचालकांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(४२) १००५४७ (२९-१२-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा मोटार चालक-मालक संघटनेच्या माध्यमातून शासकीय धान्याचा पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा पुरवठा विभागाने माहे जुलै व ऑगस्ट, २०१७ या दोन महिन्याचे जवळपास ४९ लाख रुपयांची देयेके (गाडी भाडे व कर्मचाऱ्यांचा पगार) अदा न केल्याने वाहनचालकांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान काम बंद आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काम बंद आंदोलनामुळे जिल्ह्यातील धान्य पुरवठ्यावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यात असा प्रकार घडू नये म्हणून कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा मोटार चालक-मालक संघटना यांनी दि. १४ सप्टेंबर, २०१७ ते १८ सप्टेंबर, २०१७ पर्यंत कोणतीही पूर्वसूचना न देता धान्य उचल थांबवलेली होती. वाहतूक संघटनेकडून माहे जूलै, २०१७ चे देयक दि. २८ ऑगस्ट, २०१७ रोजी कार्यालयास प्राप्त झालेले

होते. त्यानंतर सदर देयकाची छाननी करुन छाननी अंती त्रूटींची पूर्तता करुन दि. १६ सप्टेंबर, २०१७ रोजी देयक अदा केले होते. तसेच माहे ऑगस्ट, २०१७ चे देयक दि. १३ सप्टेंबर, २०१७ रोजी प्राप्त झालेले होते. सदर देयकाची छाननी करुन दि. १८ सप्टेंबर, २०१७ रोजी देयक अदा करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही. माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये माहे ऑक्टोबर, २०१७ साठीच्या अन्नधान्याची उचल करण्यात येत होती. चार दिवस उचल न केल्याने प्राधान्य कुटुंब योजनेतील १२३ मे.टन तांदुळ व ५०५ मे.टन गहू व्यपगत झाला त्यास भारतीय खाद्य निगम, कडून मुदतवाढ घेऊन उचल पूर्ण केलेली आहे. लाभार्थ्यांच्या धान्य पुरवठ्यावर कोणत्याही प्रकारचा परिणाम झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील ग्रामीण भागात पंतप्रधान उज्वल योजनेतील गॅस वाटपातील पात्र लाभार्थी वंचित राहिल्याबाबत**

**(४३) १००८०२ (२९-१२-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील ग्रामीण भागात पंतप्रधान उज्वल योजनेतील गॅस वाटप वितरकांची मनमानी चालल्यामुळे उक्त योजनेतील पात्र लाभार्थी वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित तहसीलदार व गॅस पुरवठा वितरक यांच्यात ताळमेळ नसून गॅस वितरक लाभार्थ्यांच्या यादया व कागद पत्रे परस्पर नेऊन केंद्र शासनाची दिशाभूल करत असल्याचे संबंधित पुरवठा अधिकारी यांच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेतील पात्र झालेल्या लाभार्थ्यांची यांची नावे संबधित ग्रामपंचायतीने फलकावर लावण्याचे सक्त आदेश शासनाने दिले असल्यामुळे पात्र अपात्र कोण आहेत याबाबत नागरिकात संभ्रम निर्माण झाल्याचे ही आढळून आले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली व पात्र लाभार्थ्यांना उक्त योजनेचा लाभ मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अशा स्वरुपाची कोणतीही तक्रार जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांचेकडे प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

पंतप्रधान उज्वल योजनेतील पात्र झालेल्या लाभार्थ्यांची नावे असलेली यादी ग्रामपंचायतीने फलकावर लावली असल्याबाबत तहसीलदार, मंगळवेढा यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पट्टणकोडोली (ता.हातकंणगले, जि.कोल्हापूर) येथील इतिहासकालिन गावखणीच्या सुशोभीकरण व प्रदूषणमुक्तीसाठीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) १००८११ (३०-१२-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पट्टणकोडोली (ता.हातकंणगले, जि.कोल्हापूर) येथील इतिहासकालिन गावखणीच्या सुशोभीकरण व प्रदूषणमुक्तीसाठीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) खरेदी विक्री केंदाने गोदाम अभावी मका खरेदी बंद केल्याबाबत**

**(४५) १०१२८८ (२९-१२-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) खरेदी विक्री केंदाने मका ठेवण्यासाठी जागा गोदाम उपलब्ध नसल्यामुळे दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास खरेदी बंद केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त खरेदी विक्री केंदाने खरेदी बंद केल्याने शेतक-यांना हमी भावापेक्षा कमी भावाने मका विक्री करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार खरेदी विक्री केंदाने खरेदी सुरु करण्यासाठी व शेतकऱ्यांना हमी भावाने किंमत मिळण्यासाठीकोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच हमी भावापेक्षा कमी दराने मका खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

नोव्हेंबरच्या दरम्यान खरेदी सुरु केलेली नसल्याने येवला संघाने तहसिलदार यांना सुरु होणा-या मका खरेदीसाठी गोदाम उपलब्ध करुन देण्याबाबत पत्र दिले होते. आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत गोदाम उपलब्ध नसल्याने खरेदी केंद्र सुरु झाले नव्हते.

(२) हे खरे नाही.

पावसाच्या पाण्याने ओला झालेला व काळा पडलेला नॉन एफ. अे.क्यू. (Non-FAQ ) दर्जाचा तसेच १८ ते २० टक्के आर्द्रता असलेला मका शेतक-यांनी विक्रीस आणल्याने शेतक-यांना हमी भावापेक्षा कमी भावाने खाजगी व्यापा-यांना मका विक्री करावा लागलेला आहे.नॉन एफ. अे. क्यू.(Non-FAQ ) दर्जाचा मका आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत केंद्र शासनाकडुन खरेदी केला जात नाही.

(३) ६१८ शेतक-यांची ऑनलाईन नोंदणी केलेली आहे. दिनांक ४/१२/२०१७ रोजी गोदाम उपलब्ध झाल्यावर दिनांक १०/१२/२०१७ अखेर ३३ शेतक-यांकडून १८६३ क्विंटल मका खरेदी करण्यात आला आहे.

(४) शेतक-यांनी विक्री केलेला मका हा नॉन एफ.अे.क्यू. दर्जाचा असल्याने खाजगी व्यापा-यांना विकण्यात आला. एफ.अे.क्यू. दर्जाचा मका कमी किंमतीने विकला गेल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथे स्वतंत्र नाटयगृह उभारणेबाबत**

**(४६) १०१३६८ (३०-१२-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) शहरामध्ये एकही स्वतंत्र नाट्यगृह नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी नाट्यगृह उभारण्याची मागणी नाट्य कलावंत व रसिक यांनी अनेकदा शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त ठिकाणी स्वतंत्र नाट्यगृहाची मागणी असतांना नामसंकिर्तन विविध सभागृह स्थापन करणेबाबतची कार्यवाही सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त नाट्यगृह उभारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) “नामसंकिर्तन सभागृह” उभारण्याची कार्यवाही नगरविकास विभागामार्फत प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील प्रचितगड या पर्यटन स्थळाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४७) १०२०१९ (३०-१२-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील प्रचितगड या पर्यटन स्थळाची अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गडाचे प्रवेशद्वार ढासळत असून गडाकडे जाण्याची वाट व तळयांची अवस्था धोकादायक झाली आहे व शिवकालीन तोफा जमिनीवर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गडाच्या (पर्यटन स्थळाच्या) विकासाकरिता शासनाकडे निधीची मागणी होऊनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे या ऐतिहासिक गडाची दुरवस्था वाढत आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सदर ऐतिहासिक गडाचे विकासाकरिता व दुरुस्तीकरिता आवश्यक निधी मंजूर होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

हे राज्य संरक्षित स्मारक नसल्याने या विभागाच्या अखत्यारित नाही.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

प्रचितगड राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यायोग्यतेचा नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागातील लाभार्थी केरोसीन पासून वंचित असल्याबाबत**

**(४८) १०२०९६ (२९-१२-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये ज्यांच्याकडे गॅस कनेक्शन नाही अशा केरोसीन मिळणाऱ्या लाभार्थ्यांमधून बरेच लाभार्थ्यांची नावे वगळण्यात आल्यामुळे स्वस्त धान्य दुकानातून उक्त लाभार्थ्यांना केरोसीन पासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार वंचित असलेल्या लाभार्थ्यांच्या नावाचा समावेश करण्यासाठी व त्यांना केरोसिनचा सुरळीत पुरवठा होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

चिखली तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये शिधापत्रिकाधारकास विहित परिमाणानुसार केरोसिन वितरित करण्यात येत आहे. बिगरगॅसधारक शिधापत्रिकाधारकांकडून केरोसिन मिळण्यास पात्र असल्याबाबतचे शपथपत्र प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात केरोसीन कोट्यात होत असलेल्या कपातीबाबत**

**(४९) १०३३४९ (२९-१२-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने देशभरात केरोसीन कोटा कमी करण्याचा निर्णय घेतला असून राज्याचा कोटा केंद्र शासनाने सुमारे १२ टक्क्यांनी कमी केल्याने राज्यातील गोर-गरीब जनतेची तसेच केरोसिनचा पर्यायी इंधन म्हणून वापर करणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येत्या २ वर्षात राज्य केरोसीन मुक्त करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन घेत असल्याने राज्यातील सुमारे ३ लक्ष केरोसीन परवानाधारक बेरोजगार होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून राज्याला मिळणाऱ्या केरोसीन कोट्यात वाढ करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेल्या पाठपुराव्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, केंद्र शासनाने राज्याला मिळणाऱ्या केरोसीन कोट्यात आजतागायत किती टक्के वाढ केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१९-०१-२०१८) :** (१) केंद्र शासनाने माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये केरोसिन नियतनात सुमारे ५ % कपात केली आहे, हे खरे आहे.

नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्राच्या नियतनात कपात करुन राज्यातील सर्व जिल्ह्यांना मागणीच्या १००% इतक्या प्रमाणात माहे ऑक्टोबर, २०१७ करिता केरोसिन मंजूर करण्यात आले असून शिधापत्रिकाधारकास विहित परिमाणानुसार केरोसिन वितरित करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील गोदाम व्यवस्थापक / गोदाम किपर यांच्याकडून वसुली करण्याबाबतची होत असलेली कार्यवाही.**

**(५०) १०३३८६ (०३-०१-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रत्येक खरिप पणन हंगामात शेतकऱ्यांकडून आधारभुत किंमत योजनेंतर्गत मका/ज्वारी धान्याची खरेदी तालुक्यातील खरेदी विक्री शेतकरी संघामार्फत करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मालाची विल्हेवाट शासन स्तरावर साधारण एक ते दीड वर्षांनी करताना धान्याचे वजन व प्रत्यक्षात खरेदीच्या वेळी ताब्यात घेतलेल्या धान्याच्या वजनात नैसर्गिकरित्या तुट येते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, साठवणूक केलेला माल २०० ते ५०० दिवस झालेला असताना सरसकट तुट आलेल्या मालाच्या किंमतीच्या दीडपट रक्कमेची वसुली शासन गोदाम व्यवस्थापक / गोदाम किपर यांच्याकडून वैयक्तिकरित्या वसुली करण्याची कार्यवाही केली जाते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वसुलीची कार्यवाही थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०८-०२-२०१८) :** (१) होय. हे अंशतः खरे आहे.

आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शासनाकडून मार्केटिंग फेडरेशन लि, मुंबई व महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, नाशिक या दोन अभिकर्ता संस्थांद्‌वारे मका, ज्वारी, बाजरी या भरडधान्याची खरेदी केली जाते. या अभिकर्ता संस्थांकडून सदर खरेदीचे काम स्थानिक तालुक्यातील खरेदी विक्री शेतकरी संघामार्फत करुन घेण्यात येते.

(२), (३), (४) व (५) आधारभूत किंमत खरेदी योजना ही पूर्णत: केंद्र शासन पुरस्कृत योजना असल्याने केंद्र शासनाच्या निकषानुसारच सदर योजना राबविणे बंधनकारक ठरते. प्रत्येक हंगामासाठी केंद्र शासन खरेदी व विल्हेवाटीचे निकष ठरवून देते. केंद्र शासनाकडून सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी साठवणूक केलेल्या भरडधान्यात येणारी तूट ग्राहय धरली जाते. परंतु केंद्र शासनाने ग्राहय धरलेल्या तूटीपेक्षा जास्त तूट आल्यास जिल्हा पुरवठा अधिकारी विलंबास जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकरित्या तूट वसुल करतात.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.